
राज्यपाल

श्री आचार्य देवव्रत यांचा

# नाशिक जिल्हा दौरा

दिनांक १ व २ जानेवारी २०२६





**आचार्य देवव्रत**

**मा. राज्यपाल, महाराष्ट्र**



पिंपरखेड, तालुका दिंडोरी जिल्हा नाशिक येथे शेतकऱ्याच्या शेतात तिफन चालवून ज्वारी पेरताना राज्यपाल आचार्य देवव्रत

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# राज्यपाल
# श्री आचार्य देवव्रत यांचा
# नाशिक जिल्हा दौरा

दिनांक १ व २ जानेवारी २०२६

**सादरकर्ते**

**डॉ. प्रशांत नारनवरे, भा.प्र.से.**
मा. राज्यपालांचे सचिव

**प्रकाशक**

मा. राज्यपालांचे सचिवालय
लोकभवन, मुंबई

# प्रस्तावना



महाराष्ट्र व गुजरातचे माननीय राज्यपाल श्री आचार्य देवव्रत यांच्या दिनांक १ व २ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या नाशिक जिल्हा दौऱ्याचा हा सचित्र अहवाल सादर करताना मला अत्यंत आनंद होत आहे. सप्टेंबर २०२५ मध्ये महाराष्ट्राच्या राज्यपालपदाचा अतिरिक्त पदभार स्वीकारल्यानंतर राज्यपालांनी राज्यातील नितीनिर्माते, लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांमध्ये नैसर्गिक शेतीबाबत जनजागृती करण्याचे ध्येय समोर ठेवून कामाला सुरुवात केली. सुरुवातीला त्यांनी राज्य मंत्रिपरिषदेचे सदस्य तसेच राज्य विधानमंडळाच्या सदस्यांना नैसर्गिक शेती विषयावर मार्गदर्शन केले. त्यानंतर त्यांनी पुणे येथील कृषी महाविद्यालय कृषी विद्यापीठांचे कुलगुरु, कृषी वैज्ञानिक, कृषी अधिकारी तसेच शेतकऱ्यांशी संवाद साधला.

या विषयावर प्रत्यक्ष शेतकऱ्यांशी थेट संवाद साधण्याची माननीय राज्यपालांची तीव्र इच्छा होती. त्या दृष्टीने महाराष्ट्रातील एखाद्या गावास भेट देण्याबाबत त्यांनी सूचित केले होते. त्यानुसार माननीय राज्यपालांनी नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यातील पिंपरखेड गावास भेट दिली. यावेळी राजशिष्टाचार बाजूला ठेवून त्यांनी गावातील आदिवासी आश्रमशाळेत मुक्काम केला.

आपल्या दौऱ्यात राज्यपालांनी आदिवासी विद्यार्थ्यांशी संवाद साधला, त्यांच्यासोबत सकाळची न्याहारी घेतली तसेच योगसत्रात सहभागी होऊन त्यांना योगासनांचे महत्त्व पटवून दिले. माननीय राज्यपालांनी शेतात श्रमदान केले, स्वतः तिफन चालवून ज्वारीची पेरणी केली आणि नैसर्गिक शेती, स्वच्छता व वृक्षारोपण यांचे महत्त्व शेतकऱ्यांना पटवून दिले. ग्रामसभेत त्यांनी ग्रामस्थांशी विविध विषयांवर संवाद साधला. महाराष्ट्रातील ही त्यांची पहिलीवहिली ग्रामभेट प्रशासनातील सर्व घटकांसाठी अत्यंत प्रेरणादायी व समृद्ध अनुभव ठरली.

माननीय राज्यपालांच्या संवाद यात्रेतून एक गोष्ट अधोरेखित झाली: ती म्हणजे शाश्वत विकास आणि समावेशक शासन हे प्रत्यक्ष लोकसहभाग, संवेदनशीलता आणि सक्रिय भागीदारीतूनच साध्य होऊ शकते.

**(डॉ. प्रशांत नारनवरे, भाप्रसे)**
राज्यपालांचे सचिव

# राज्यपालांच्या दौऱ्याचा उद्देश

- **एक पेड माँ के नाम - वृक्षारोपण व वृक्ष संवर्धनाबाबत जनजागृती**
- **नैसर्गिक शेतीचा प्रचार प्रसार व जनजागृती**
- **शाश्वत शेतीसाठी गौ पालन**
- **ग्राम स्वच्छता अभियान**
- **केंद्र व महाराष्ट्र शासनाच्या लोककल्याणकारी योजनांची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचवणे**
- **सामाजिक समरसतेचा संदेश: अनुसूचित जाती - अनुसूचित जनजाती कुटुंबियांसह भोजन व चर्चा**
- **चावडी चर्चा: ग्रामसभेच्या माध्यमातून लोकांचे प्रबोधन**
- **शासकीय विद्यालय / आदिवासी आश्रमशाळेत रात्री मुक्काम करून साध्या राहणीचा वस्तुपाठ**
- **पशुपालक कुटुंबाला भेट, गाईची धार काढणे व गोरक्षणाचा संदेश देणे**
- **तालुका स्तरावर शेतकरी, कृषी सखी, शेतकरी मित्र व कृषी वैज्ञानिकांशी संवाद**
- **प्रत्येक जिल्हा दौऱ्यामध्ये किमान ५००० नागरिकांशी सुसंवाद**

# नाशिक येथे आगमन व मानवंदना





महाराष्ट्र व गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांचे  दिनांक १ व २ जानेवारी २०२६ या दोन दिवसांच्या नाशिक जिल्हा दौऱ्यासाठी आगमन झाले. ओझर येथे विमानतळावर राज्याचे अन्न आणि औषधी प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, विभागीय आयुक्त डॉ. प्रविण गेडाम, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. संजीव सोनवणे तसेच इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी राज्यपालांचे स्वागत केले.

The Governor of Maharashtra and Gujarat, Acharya Devvrat arrived, on a two-day visit to Nashik district. At the airport in Ojhar, the Governor was welcomed by Minister for Food and Drug Administration Narhari Zirwal, Divisional Commissioner Dr. Pravin Gedam, Vice-Chancellor of YCMOU Dr. Sanjeev Sonawane, and other senior officials.



# सह्याद्री फार्म येथे शेतकरी, कृषी अधिकाऱ्यांशी संवाद







रासायनिक खते, कीटकनाशकांच्या अती वापराने देशातील सुपीक जमीन नापीक केली आहे. नापीक जमीन सुपीक बनवून देशाला आत्मनिर्भर करण्यासाठी नैसर्गिक शेती काळाची गरज आहे, असे प्रतिपादन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केले.

दिंडोरी तालुक्यात मोहाडी येथील सह्याद्री फार्म येथे आयोजित नैसर्गिक शेती संवादात ते बोलत होते.

यावेळी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, खासदार भास्कर भगरे, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, सह्याद्री फार्मचे व्यवस्थापकीय संचालक विलास शिंदे उपस्थित होते.

The Governor of Maharashtra and Gujarat Acharya Devvrat addressed a Natural Farming Dialogue organized at Sahyadri Farm in Mohadi Dindori taluka. in Nashik. On the occasion, Minister for Food and Drug Administration Narhari Zirwal, MP Bhaskar Bhagare, Divisional Commissioner Dr. Pravin Gedam, and Managing Director of Sahyadri Farm Vilas Shinde were present. The Governor said, excessive use of chemical fertilizers and pesticides has rendered the country's fertile land barren. He added that in order to restore barren land to fertility and to build a self-reliant India, natural farming is the need of the hour.

# नैसर्गिक शेती काळाची गरज

-राज्यपाल आचार्य देवव्रत

## सह्याद्री फार्म येथे शेतकरी, कृषी सखींसह कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांशी साधला संवाद

**नाशिक, दि. 1 जानेवारी 2026 (जिमाका वृत्तसेवा) :** रासायनिक खते, कीटकनाशकांच्या अती वापराने देशातील सुपीक जमीन नापीक केली आहे. नापीक जमीन सुपीक बनवून आत्मनिर्भर भारत करण्यासाठी नैसर्गिक शेती काळाची गरज आहे, असे प्रतिपादन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केले.

दिंडोरी तालुक्यात मोहाडी येथील सह्याद्री फार्म येथे आयोजित नैसर्गिक शेती संवादात ते बोलत होते. यावेळी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, खासदार भास्कर भगरे, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, राज्यपाल यांचे सचिव प्रशांत नारनवरे, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, विभागीय कृषी सहसंचालक सुभाष काटकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने, सह्याद्री फार्मचे व्यवस्थापकीय संचालक विलास शिंदे उपस्थित होते.

राज्यपाल म्हणून नव्हे, तर शेतकरी म्हणून संवाद साधण्यासाठी आल्याचे नमूद करून राज्यपाल श्री. देवव्रत म्हणाले, हरित क्रांती ही आपली गरज होती. तेव्हा जमीन सुपीक होती. त्यामुळे हेक्टरी १३ किलो युरिया वापराची सूचना कृषी शास्त्रज्ञांनी केली होती. आज हे प्रमाण अनेक पटींनी वाढले आहे. त्याचे विपरीत परिणाम आता दिसून येत आहेत. सुपीक जमिनीतील सूक्ष्म जीव मृतप्राय झाले आहेत. याबरोबरच जगाला तापमान वाढीची समस्या भेडसावत आहे. त्यामुळे काही भागात तीव्र उन्हाळा, तर काही भागात अतिवृष्टी होत असल्याचे दिसून येत आहे. खते, कीटकनाशकांचे अंश अन्नधान्यात आढळून येत आहेत. या अन्नधान्यामुळे मानवी प्रतिकार क्षमता कमी होऊन दुर्धर आजाराचे रुग्ण वाढत आहेत. ही बाब चिंताजनक आहे. जमिनीची जलसंधारणाची क्षमताही कमी झाली आहे. हे सर्व टाळायचे असेल, तर आपल्याला नैसर्गिक शेतीशिवाय पर्याय नाही. त्याबरोबरच गो पालनाला चालना दिली पाहिजे, असेही राज्यपाल श्री. देवव्रत यांनी सांगितले.

नैसर्गिक शेतीचा कृषी विभागाने प्रचार आणि प्रसार करावा. तसेच सह्याद्री फार्मने परिसरातील शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीला प्रोत्साहित करावे, असेही आवाहन राज्यपाल श्री. देवव्रत यांनी केले.

विभागीय आयुक्त डॉ. गेडाम म्हणाले, राज्यात नाशिक जिल्हा कृषी क्षेत्रात आघाडीवर आहे. जिल्ह्यात १० लाख हेक्टर क्षेत्रात विविध पिके घेतली जातात. येथील कांदा, द्राक्ष आणि वाइनला भौगोलिक मानांकन मिळाले आहे. जिल्ह्यात केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. तसेच राज्यपाल श्री. देवव्रत यांच्या मार्गदर्शनामुळे शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीसाठी प्रेरणा मिळून शेतकरी प्रगती साधतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. प्रारंभी मंगेश बासकर यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमानंतर राज्यपाल श्री. देवव्रत यांनी शेतकऱ्यांच्या स्टॉलला भेट देत त्यांच्याशी संवाद साधला.

यावेळी उपवनसंरक्षक सिद्धेश सावर्डेकर, आत्माचे प्रकल्प संचालक अभिमन्यू काशिद यांच्यासह शेतकरी, ग्रामस्थ, कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



# पिंपरखेड येथे आगमन व स्वागत



राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, पिंपरखेड येथे भेट दिली. यावेळी विद्यार्थ्यांच्या वतीने लाठीकाठी प्रात्यक्षिके करत राज्यपाल महोदयांना मानवंदना दिली. त्यानंतर विद्यार्थिनींनी लेझीम प्रात्यक्षिकाद्वारे उपस्थितांची मने जिंकली. सर्व मुलांचे राज्यपालांनी कौतुक केले.

यावेळी आदिवासी विकास मंत्री प्रा. अशोक उईके यांनी सन्मानचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन तर अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी शबरी उत्पादने देऊन राज्यपालांचे स्वागत केले.

Governor Acharya Devvrat visited the Government Secondary Ashram School at Pimparkhed, Tq Dindori, Dist Nashik.

The Governor was welcomed by the  with traditional lathi-kathi demonstrations. This was followed by a lezim performances by girl students. The Governor commended the students for their skills and enthusiasm.

**वृत्त क्रमांक 3** **दि. 1 जानेवारी 2026**

# राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या सहज संवादाने जिंकली पिंपरखेडकरांची मने गावकऱ्यांच्या उत्स्फूर्त स्वागताने राज्यपाल महोदय भारावले

**नाशिक, दि. 1 जानेवारी 2026 (जिमाका वृत्तसेवा) :** जेमतेम दोन हजार लोकसंख्या असलेल्या दिंडोरी तालुक्यातील पिंपरखेड गावी आज वेगळीच लगबग होती. गावकऱ्यांच्या चेहऱ्यावर कुतूहल आणि उत्सुकता होती आणि त्याचबरोबर येणाऱ्या पाहुण्याच्या स्वागतासाठी ओसंडणारा आनंदही चेहऱ्यावर दिसत होता. महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज सायंकाळी या गावात प्रवेश केला आणि अवघे गाव आनंदले. बैलगाडीतून काढलेली मिरवणूक. त्यासमोर पारंपरिक आदिवासी नृत्याने भारावलेले वातावरण, लहान मुलांचे लेझीम नृत्य, टाळ, मृदुंगाचा ध्वनी आणि गावकऱ्यांच्या उत्साह पाहून राज्यपाल महोदयही भारावले.

निमित्त होते राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या पिंपरखेड गावच्या भेटीचे. राज्यपाल महोदय दोन दिवसांच्या नाशिक दौऱ्यावर आले आहेत. त्यात पिंपरखेड गावी ते मुक्काम करून गावकऱ्यांशी संवाद साधणार आहेत. महाराष्ट्राचे राज्यपाल झाल्यानंतर अशाप्रकारे राज्यातील कोणत्याही गावी भेटीची आणि मुक्कामाची ही पहिलीच वेळ असल्याचे राज्यपाल श्री. देवव्रत यांनी आपल्या संवादात सांगितले. यावेळी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, विभागीय आयुक्त डॉ प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी काश्मिरा संख्ये, कादवा कारखान्याचे चेअरमन श्रीराम शेटे, उपविभागीय अधिकारी अप्पासाहेब शिंदे, तहसीलदार मुकेश कांबळे, सरपंच सोनाली मोरे, उपसरपंच वसंत घडवजे आदी उपस्थित होते.

राज्यपाल महोदयांनी नागरिकांशी अतिशय जिव्हाळ्याने आणि मनमोकळा संवाद साधला. ते म्हणाले, हा माझ्या जीवनातील महत्वाचा क्षण आहे. महाराष्ट्र हा छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रदेश आहे. ही भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची कर्मभूमी आहे. अशा राज्यातील गावाला भेट देण्याचा खुप आनंद आणि समाधान असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यपाल श्री. देवव्रत म्हणाले, मी एक शेतकरी आहे. नैसर्गिक शेतीसाठी मी आग्रह धरतो. स्वतः शेतकरी असल्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात किती समस्या आहेत, याची मला जाणीव आहे. त्यामुळे राजभवन अर्थात लोकभवनमध्ये मी खूप कमी राहतो. लोकमध्ये राहायला मला आवडतं, अशा शब्दात त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

रासायनिक खतांमुळे शेतीचे अतोनात नुकसान होत आहे. त्यामुळेच नैसर्गिक शेतीचा मी आग्रह धरतो. माझ्या शेतात ८ प्रजातींच्या ४५० गायी आहेत. त्यातील ६ प्रजाती भारतीय आहेत, असेही ते म्हणाले.

राज्यपाल महोदयांच्या साधेपणा आणि थेट संवाद साधण्याच्या शैलीने गावकऱ्यांची मने मात्र जिंकून घेतली. राज्यपाल महोदयांनी गावात मुक्काम करणार असल्याचे सांगताच गावकऱ्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला.





# 'एक पेड माँ के नाम'





पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या 'एक पेड माँ के नाम' उपक्रमांतर्गत राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज पिंपरखेड (ता. दिंडोरी), जिल्हा नाशिक येथील कै. लक्ष्मण बाबाजी धात्रक माध्यमिक विद्यालय येथे वृक्षारोपण केले.

Under the 'Ek Ped Maa Ke Naam' initiative envisioned by Prime Minister Narendra Modi, Maharashtra and Gujarat Governor Acharya Devvrat planted a sapling at Late Laxman Babaji Dhatrak Secondary School at Pimparkhed, Taluka Dindori, Dist. Nashik.

# राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते पिंपरखेड शाळेत वृक्षारोपण

**नाशिक, दि. 1 जानेवारी 2026 (जिमाका वृत्तसेवा) :** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल विभागाच्या 'एक पेड माँ के नाम' उपक्रमांतर्गत राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज पिंपरखेड (ता. दिंडोरी) येथील कै. लक्ष्मण बाबाजी धात्रक माध्यमिक विद्यालय येथे वृक्षारोपण केले.

यावेळी अन्न औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, सामाजिक न्याय मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके, आदिवासी विभागाचे सचिव विजय वाघमारे, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, वन विभागाचे मुख्य वनसंरक्षक जी. मल्लिकार्जुन, आदिवासी विकास आयुक्त लीना बन्सोड, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, आदिवासी विकास प्रकल्प नाशिकच्या प्रकल्प अधिकारी अर्पिता ठुबे, कळवणच्या काश्मिरा संख्ये, उपवनसंरक्षक (पश्चिम) सिद्धेश सावर्डेकर, उपवनसंरक्षक (पूर्व) राकेश सेपट आदी उपस्थित होते. त्यानंतर, राज्यपाल श्री. देवव्रत यांनी शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, पिंपरखेड येथे भेट दिली. यावेळी आदिवासी विकास मंत्री प्रा. अशोक उईके यांनी सन्मानचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन तर अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी शबरी उत्पादने त्यांचे स्वागत केले.

यावेळी विद्यार्थ्यांच्यावतीने लाठीकाठी प्रात्यक्षिके करत आणि सलामी देऊन राज्यपाल महोदयांना मानवंदना दिली. त्यानंतर विद्यार्थिनींनी लेझीम प्रात्यक्षिकाराद्वारे उपस्थितांची मने जिंकली. या मुलांचे राज्यपाल महोदयांनी कौतुक केले. हा परिसर अतिशय सुंदर असल्याची भावनाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.



# राज्यपालांची बैलगाडीतून मिरवणूक



राज्यपाल आचार्य देवव्रत यांचे नाशिक जिल्ह्याच्या दिंडोरी तालुक्यातील पिंपरखेड गावी मुक्कासाठी आगमन झाले. सायंकाळी गावात प्रवेश केल्यावर राज्यपालांची बैलगाडीतून मिरवणूक काढण्यात आली. पारंपरिक आदिवासी नृत्य, लहान मुलांचे लेझीम नृत्य, टाळ, मृदुंगाचा ध्वनी आणि गावकऱ्यांचा उत्साह पाहून राज्यपाल भारावले.

Governor Acharya Devvrat arrived at Pimparkhed village in Dindori taluka of Nashik district for an overnight stay. Upon his entry into the village in the evening, the Governor was taken in a bullock cart procession.



पिंपरखेड गावी राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी गावकऱ्यांशी संवाद साधला. रासायनिक खतांमुळे शेतीचे अतोनात नुकसान होत आहे. त्यामुळेच आपण नैसर्गिक शेतीचा आग्रह धरतो असे सांगताना. माझ्या शेतात ८ प्रजातींच्या ४५० गायी आहेत. त्यातील ६ प्रजाती भारतीय आहेत, असेही राज्यपालांनी सांगितले. राज्यपाल महोदयांनी गावात मुक्काम करणार असल्याचे सांगताच गावकऱ्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

At Pimparkhed, Governor Acharya Devvrat interacted with the villagers. He was deeply moved by the traditional tribal dances, lezim performances by young children, the rhythmic sounds of cymbals and drums, and the enthusiasm of the villagers.

# महाराजस्व अभियानात लाभार्थ्यांना प्रमाणपत्र आणि साहित्याचे वाटप







# महाराजस्व अभियानात लाभार्थ्यांना प्रमाणपत्र आणि साहित्याचे वाटप

नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यातील पिंपरखेड येथे राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या प्रमुख उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान राबविण्यात आले.

यावेळी याठिकाणी विविध विभागांचे एकूण २३ स्टॉल्स मांडण्यात आले होते.

राज्यपाल महोदयांनी यावेळी प्रातिनिधिक स्वरूपात प्रमाणपत्र आणि साहित्याचे वितरण केले.

घरकुल, दिव्यांग प्रमाणपत्र यासह बहुविभागीय योजनांचा लाभ यावेळी लाभार्थ्यांना देण्यात आला. तसेच सीमा सुरक्षा दलामध्ये निवड झाल्याबद्दल नवनाथ गांगुर्डे यांचा आणि त्यांच्या पालकांचा सत्कारही राज्यपाल महोदयांनी केला.

दत्तात्रय वाणी यांना राज्यस्तरीय क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी दिंडोरी तालुक्यातील शहीद झालेल्या जवानांच्या आई वडिलांचाही सन्मान करण्यात आला.

Maharashtra and Gujarat Governor Acharya Devvrat attended the programme organised under the Chhatrapati Shivaji Maharaj Mahaswa Abhiyan at Pimparkhed in Dindori taluka of Nashik district. On this occasion, a total of 23 stalls of various departments were set up at the venue. The Governor distributed certificates and benefits on a representative basis. Beneficiaries were provided with the benefits of various multi-departmental schemes, including housing (Gharkul) and disability certificates. The Governor also felicitated Navnath Gangurde and his parents for his selection in the Border Security Force (BSF). Dattatraya Wani was honoured for receiving the State-level Krantijyoti Savitribai Phule Ideal Teacher Award. On this occasion, the parents of martyred soldiers from Dindori taluka were also honoured.

# आदिवासी कुटुंबाच्या घरी राज्यपालांचे भोजन





वृत्त क्रमांक 4 दि. | दि. 1 जानेवारी 2026

# पिंपरखेडच्या साबळे कुटुंबियांच्या घरी राज्यपालांनी घेतला भोजनाचा आस्वाद

**नाशिक, दि. 1 जानेवारी 2026 (जिमाका वृत्तसेवा) :** राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी दिंडोरी तालुक्यातील पिंपरखेड या गावातील साबळे कुटुंबाच्या घरी नागलीची भाकरी, उडीदाचे वरण आणि हरभऱ्याच्या भाजीचा आस्वाद घेतला. राज्याच्या प्रथम नागरिकाने आपल्या घरी भोजनाचा आस्वाद घेतल्याने साबळे कुटुंबीय भारावले होते.

हिरामण शंकर साबळे यांचे गावात साधे घर आहे. त्यांच्या घरी राज्यपाल महोदय जेवणाला येणार, अशी माहिती मिळताच त्यांनी तयारी सुरू केली. घराला रंग रंगोटी केली. प्रवेशद्वाराच्या भिंती वारली चित्रकलेने साकारली होती. साबळे कुटुंबातील गोजरताईने राज्यपालासांसाठी लाल, पांढरी नागली आणि बाजरीच्या भाकरी, अळू आणि वर्कण कंदाची भाजी, हरभराची भाजी, उडीदाचे वरण तयार केले होते. राज्यपाल श्री. देवव्रत यांच्यासमवेत विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, राज्यपालांचे सचिव प्रशांत नारनवरे यांच्यासह साबळे कुटुंबातील सदस्यांनी भोजनाचा आस्वाद घेतला. यावेळी राज्यपाल श्री. देवव्रत यांनी स्थानिक पिके, जीवनमान या विषयी माहिती घेतली.

राज्यपाल श्री. देवव्रत यांनी आमच्या घरी जेवण केले. ही आमच्यासाठी आनंदाची बाब आहे, असे साबळे कुटुंबातील सदस्यांनी यावेळी सांगितले.

*************

Governor Acharya Devvrat had a simple dinner at the residence of the Sabale family in Pimparkhed village of Dindori taluka of Nashik district. The Governor interacted with the family members on the occasion.



# राज्यपाल यांनी साधला पिंपरखेडच्या चावडीवर ग्रामस्थांशी संवाद







# राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी साधला पिंपरखेडच्या चावडीवर ग्रामस्थांशी संवाद

राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी गुरुवारी रात्री नाशिक जिल्ह्याच्या दिंडोरी तालुक्यातील पिंपरखेड येथील मारुती मंदिराजवळील चावडीवर ग्रामस्थांशी संवाद साधला यावेळी त्यांनी ग्रामस्थांना वृक्षारोपण, स्वच्छता, नैसर्गिक शेती, गो पालनाचे महत्त्व सांगितले.

राज्यपाल देवव्रत म्हणाले की, मला मराठी बोलता येत नाही. मात्र, आपण लवकरच मराठी भाषा शिकून घेणार आहोत.

यावेळी राज्यपालांनी परिसरात कुटुंबातील सदस्याच्या वाढदिवशी वृक्षारोपण करून त्यांचे संवर्धन करीत परिसर हिरवागार करण्याचे आवाहन केले. अनेक ग्रामस्थांनी हात वर करून राज्यपालांच्या सूचनेला सकारात्मक प्रतिसाद दिला.

ग्रामस्थांनी गट तयार करून स्वच्छतेचे नियोजन करावे. यामुळे आरोग्याच्या समस्या जाणवणार नाहीत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी स्वतः स्वच्छतेला प्राधान्य देतात. आपण शहरापासून दूर आहोत ही भावना मनात ठेवू नका. स्वतःला कधीच कमी लेखू नका. तसेच आईवडिलांचा सन्मान करताना व्यसनांपासून दूर रहावे. मुलींच्या जन्माचे स्वागत करीत त्यांना समानतेची वागणूक द्यावी, असे आवाहन राज्यपालांनी केले.

नैसर्गिक शेतीबरोबरच देशी वंशाच्या गायींचे पालन करावे. यामुळे नैसर्गिक शेतीला मदतच होईल. त्यामुळे जमीन सुपीक होऊन उत्पादन खर्च कमी होण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले.



# Governor Acharya Devvrat Interacts with villagers in Pimperkhed

Governor Acharya Devvrat interacted with villagers at the common place (chavdi) near the Maruti temple in Pimperkhed village of Dindori taluka of Nashik district.

He spoke to the villagers about the importance of tree plantation, cleanliness, natural farming, and cow rearing.

The Governor said right now he is unable to converse in Marathi, but added that he would learn Marathi language shortly. During the interaction, the Governor appealed to the villagers to plant trees on the birthdays of family members and nurture them, thereby making the surroundings green. Many villagers raised their hands and responded positively to the Governor's suggestion. He urged the villagers to form groups and plan cleanliness drives, stating that this would help prevent health problems. He noted that Prime Minister Narendra Modi attached highest priority to cleanliness. He advised the villagers not to think that they are far away from cities and never to consider themselves inferior. He also appealed to them to respect their parents, stay away from addictions, welcome the birth of girls, and treat them with equality.

He further emphasized adopting natural farming along with rearing indigenous breeds of cows, stating that this would support natural farming, improve soil fertility, and help reduce production costs.



# हिवाळीच्या शाळेतील विद्यार्थ्यांचे कौतुक

यावेळी राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी जिल्हा परिषदेच्या हिवाळी, ता. त्र्यंबकेश्वर येथील शाळेतील विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या शाळेतील विद्यार्थी दोन्ही हाताने लिहू शकतात. याबरोबरच भारतीय राज्य घटनेतील कलमे, एक हजार संख्येपर्यंतचे पाढे म्हणतात. शिक्षक केशव गावित यांच्याकडून त्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीची माहिती घेतली. विद्यार्थ्यांना राज्यपाल देवव्रत यांनी भेटवस्तू दिल्या.

# Governor praises Students of Hiwali School

Governor Acharya Devvrat praised the students of the Zilla Parishad school at Hiwali, Taluka Trimbakeshwar.

The students of this school can write with both hands and can also recite articles of the Indian Constitution as well as multiplication tables up to one thousand. He gathered information about the students' progress from teacher Keshav Gavit and presented gifts to the students

# स्वच्छता मोहिम



नाशिक दौऱ्यावर आलेल्या राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी पिंपरखेड, तालुका दिंडोरी येथील मारुती मंदिर परिसरात स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला. यावेळी राज्यपालांनी गावकऱ्यांशी संवाद साधत त्यांना ग्राम स्वच्छतेचा संदेश दिला. राज्यपालांच्या हस्ते गावातील स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, विभागीय आयुक्त डॉ प्रवीण गेडाम व जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

During his visit to Nashik district, Governor Acharya Devvrat participated in a cleanliness drive at the Maruti Temple complex in Pimparkhed village of Dindori taluka. The Governor interacted with the villagers and gave the message of village cleanliness. He also felicitated the sanitation workers from the village.

# राज्यपालांच्या हस्ते स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सत्कार








# पिंपरखेडच्या शासकीय आश्रमशाळेत केला योगाभ्यास



महाराष्ट्र व गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आपल्या नाशिक जिल्ह्याच्या दौर्यात दिंडोरी तालुक्यातील पिंपरखेड येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेत मुक्काम केला. सकाळी राज्यपालांनी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसह योगाभ्यास केला व त्यांना योगासनाचे महत्व पटवून दिले. यावेळी विभागीय आयुक्त डॉ प्रवीण गेडाम यांनी देखील योगासने केली.

The Governor of Maharashtra and Gujarat Acharya Devvrat had an overnight stay at a simple Government Tribal Residential School at Pimparkhed village in the Dindori Taluka of Nashi district. The next morning, the Governor performed yoga exercises along with the students of the Ashram School He explained to the students the importance of yoga asanas for a healthy living. Nashik Divisional Commissioner Dr. Pravin Gedam also participated in the yoga session.





# राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी विद्यार्थ्यांना योगाभ्यासातून दिला फिटनेसचा मंत्र

## पिंपरखेडच्या शासकीय आश्रमशाळेत केला योगाभ्यास

**नाशिक, दि. २ (जिमाका वृत्तसेवा) :** राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज सकाळी पिंपरखेड (ता. दिंडोरी) येथील आदिवासी विकास विभागाच्या शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसमवेत योगाभ्यास केला. त्यांनी विविध योग प्रात्यक्षिके दाखवितांनाच विद्यार्थ्यांना 'फिटनेसचा डोस, आधा घंटा रोज' असे सांगत तंदुरुस्तीचा मार्ग सांगितला.

राज्यपाल श्री. देवव्रत यांच्यासमवेत विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, राज्यपालांचे सचिव प्रशांत नारनवरे या योगाभ्यासात सहभागी झाले होते.

राज्यपाल श्री. देवव्रत यांनी विद्यार्थ्यांना योगाभ्यासाचे महत्व सांगत त्याचे लाभ सांगितले. ते म्हणाले, नियमितपणे योग केल्याने शरीर तंदुरुस्त आणि लवचिक राहते आणि सोबतच आपले आरोग्यही चांगले राहण्यास मदत होते. त्यामुळे प्रत्येकाने रोज किमान अर्धा तास योग प्रात्यक्षिके केली पाहिजेत. श्री. देवव्रत यांनी विद्यार्थ्यांसमवेत प्राणायाम, अनुलोम विलोम, सेतुबंध, सर्वांगासन, वज्रासन, वक्रसन, मत्स्यासन, सूर्य नमस्कार, शशांकासन, योग मुद्रासन आदी आसने करीत विद्यार्थ्यांना योगासनांचे धडे दिले. ही सर्व आसने केल्याने मन शांत आणि निरोगी राहण्यास मदत होईल, असेही त्यांनी सांगितले.

तत्पूर्वी राज्यपाल श्री. देवव्रत यांनी आश्रमशाळेची पाहणी करीत विद्यार्थ्यांशी आपुलकीने संवाद साधला.

# राज्यपालांची विद्यार्थ्यांसोबत न्याहारी




महाराष्ट्र व गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यातील पिंपरखेड येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांसह सकाळची न्याहारी घेतली व विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

The Governor of Maharashtra and Gujarat Acharya Devvrat had breakfast and interaction with the students of the Government Tribal Ashram School at Pimparkhed in Dindori taluka of Nashik district.

# मुलांनो खूप खूप शिका...मेहनत करा, मोठे व्हा!
# राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी साधला विद्यार्थ्यांशी संवाद

**नाशिक, दि. २ (जिमाका वृत्तसेवा) :** मुलांनो खूप शिकून मोठे व्हा. त्यासाठी परिश्रम घ्या, असे आवाहन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केले.

पिंपरखेड, ता. दिंडोरी येथील आदिवासी विकास विभागाच्या शासकीय निवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांशी सकाळच्या नाश्त्याच्यावेळी त्यांनी संवाद साधला. यावेळी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, राज्यपाल यांचे सचिव प्रशांत नारनवरे, आदिवासी विकास विभागाच्या आयुक्त लीना बनसोड, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, सहायक जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे, कश्मिरा संख्ये, आदिवासी विकास विभागाचे अपर आयुक्त दिनकर पावरा आदी उपस्थित होते. राज्यपाल श्री. देवव्रत यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्याबरोबर नाश्ता घेतला. यावेळी त्यांनी विद्यार्थी कोणत्या वर्गात शिक्षण घेत आहे. कुटुंबात सदस्य किती, आईवडील काय करतात, अशी आपुलकीने चौकशी केली. त्यांनी आयुक्त श्रीमती बनसोड यांच्याकडून आश्रमशाळा तेथील शिक्षणाचे माध्यम याविषयी सविस्तर माहिती जाणून घेतली.

यावेळी राज्यपाल श्री. देवव्रत यांना विद्यार्थिनीने काढलेले लहानसे चित्र भेट दिले. राज्यपालांसमवेत नाश्ता करतांना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.



# शेतकऱ्यांशी साधला बांधावर संवाद





# जीवामृत हेच नैसर्गिक शेतीचे 'अमृत'- राज्यपाल आचार्य देवव्रत

# शेतकऱ्यांशी साधला बांधावर संवाद

**नाशिक, दि. २ (जिमाका वृत्तसेवा):** रासायनिक खते, कीटकनाशकांच्या अतीवापरामुळे नापीक झालेली जमीन सुपीक करावयाची असेल, तर आपल्याला नैसर्गिक शेतीकडे वळावे लागेल. या शेतीसाठी जीवामृत हेच अमृत आहे, असे सांगत राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी शेतकऱ्यांना त्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले.

राज्यपाल श्री. देवव्रत यांनी आज सकाळी पिंपरखेड येथील शेतकरी सुनील घडवजे यांच्या शेतावर जाऊन श्रमदान केले. त्यानंतर तेथेच त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, राज्यपाल यांचे सचिव प्रशांत नारनवरे, आदिवासी विकास विभागाच्या आयुक्त लीना बनसोड, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, सहायक जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे, कश्मिरा संख्ये, आदिवासी विकास विभागाचे अपर आयुक्त दिनकर पावरा, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने, आत्माचे प्रकल्प संचालक अभिमन्यू काशिद, सरपंच सोनाली मोरे आदी उपस्थित होते. राज्यपाल श्री. देवव्रत यांनी सांगितले, नैसर्गिक शेतीला प्राधान्य देणे काळाची गरज आहे. या शेतीमुळेच जमीन सुपीक होण्यास मदत होईल. या शेतीचा गावागावात प्रचार आणि प्रसार करावा. याबरोबरच शेतकऱ्यांनी देशी गायींचे पालन करून त्यांचे संवर्धन करावे. त्यांचे पालन नैसर्गिक शेतीला पूरक ठरणारे आहे, असे सांगत त्यांनी जीवामृत तयार करण्याचे प्रात्यक्षिक उपस्थित शेतकऱ्यांना दाखविले.

प्रारंभी राज्यपाल श्री. देवव्रत, मंत्री श्री. झिरवाळ यांनी श्रमदान करीत चाऱ्याची कापणी केली. तो त्यांनी गाय आणि कालवडीला खाऊ घातला. त्यानंतर शेतकऱ्यांकडून त्यांचेकडे असलेल्या गायींची माहिती घेतली. प्रत्येक शेतकऱ्यांने गो पालन करण्याचे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले.

Maharashtra and Gujarat Governor Acharya Devvrat today told farmers that Jeevamrut is like nectar which can restore the fertility of land rendered barren due to excessive use of chemical fertilizers and pesticides. The Governor was speaking to the farmers while demonstrating the preparation of Jivamrut to farmers.

The Governor visited the farm of farmer Sunil Ghadwaje at Pimparkhed in Dindori Taluks of Nashik district this morning. He also participated in shramdaan (voluntary labour). He later interacted with farmers at the site and addressed them on the occasion.



# राज्यपालांनी तिफनवर केली ज्वारीची पेरणी







# खोरीपाडाच्या सम्राट राऊत यांच्या शेतात राज्यपालांनी तिफनवर केली ज्वारीची पेरणी

**नाशिक, दि. २ (जिमाका वृत्तसेवा) :** दिंडोरी तालुक्यातील खोरीपाडा येथील आदर्श शेतकरी सम्राट राऊत यांच्यासाठी आज आनंदाचा दिवस होता. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज सकाळी त्यांच्या शेताला भेट देऊन त्यांना सुखद धक्का दिला. एवढेच नव्हे तर तिफनवर ज्वारीची पेरणी करून आपण शेती आणि शेतकरी यांच्याविषयी असलेल्या आत्मीयतेचे दर्शन घडविले. इतरही शेतकऱ्यांशी शेतीविषयी चर्चा करतांना त्यांना नैसर्गिक शेतीकडे वळण्याचे आवाहन केले. राज्यपालांच्या भेटीने शेतकऱ्यांना झालेला आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. नाशिक जिल्हा दौऱ्यात ग्रामस्थांकडून मिळालेल्या प्रेमाने व आदरातिथ्याने भारावून गेल्याची भावना श्री. देवव्रत यांनी व्यक्त केली.

आपण स्वतः शेतकरी असून अनेक देशी गायी असल्याने संपूर्णपणे नैसर्गिक शेती करतो आणि ती लाभदायी असल्याने शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेतीकडे वळावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी राऊत कुटुंबानेदेखील नैसर्गिक शेतीत पिकविलेल्या वस्तूंची अनोखी भेट देऊन राज्यपाल श्री. देवव्रत यांचा सत्कार केला. राज्यपालांची ही भेट स्मरणीय करण्यासाठी पावरी हे आदिवासी बांधवांचे पारंपरिक वाद्य त्यांना भेट देण्यात आले. यावेळी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, खासदार भास्कर भगरे, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, राज्यपालांचे सचिव प्रशांत नारनवरे, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने आदी उपस्थित होते.

## राऊत कुटुंबियांचे खास आदरातिथ्य

राऊत कुटुंबाने खास ग्रामीण चवीची नागलीची पेज, तांदळाचे धिरडे तयार करून राज्यपाल महोदयांचे आदरातिथ्य केले. श्री. देवव्रत यांनी या पदार्थांचा आनंदाने आस्वाद घेत ते आवडल्याची पावतीही दिली. कौटुंबिक स्नेहाचा परिचय देत त्यांनी कुटुंबातील सदस्यांची प्रेमाने विचारपूस केली. त्यांनी जनावरांच्या गोठ्याची पाहणी आणि शेताच्या बांधावर वृक्षारोपणही केले. तसेच पशुसंवर्धन विभागाने लावलेल्या स्टॉलला भेट दिली. पारंपारिक आदिवासी संस्कृतीनुसार राज्यपाल महोदयांचे करण्यात आलेले औक्षण आणि स्वागताचा श्री. देवव्रत यांनी मोकळेपणाने केलेला स्वीकार उपस्थित शेतकऱ्यांसाठी आनंदाचा अनुभव होता. राज्यपाल महोदयांनी श्री. राऊत यांनी राबविलेल्या विविध उपक्रमांचे केलेले कौतुकही कुटुंबातील सदस्यांना सुखावून गेले.

यावेळी परिसरातील शेतकरी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्यपाल आचार्य देवव्रत यांची अवनखेड ग्रामपंचायतीला भेट






# राज्यपाल आचार्य देवव्रत यांची अवनखेड ग्रामपंचायतीला भेट

**नाशिक, दि. 2 (जिमाका वृत्तसेवा)** : राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज सकाळी दिंडोरी तालुक्यातील आदर्श ग्रामपंचायत अवनखेड ला भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी ग्रामपंचायतीच्या कामाची प्रशंसा केली.

यावेळी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, राज्यपालांचे सचिव प्रशांत नारनवरे, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील, सहायक जिल्हाधिकारी कश्मिरा संख्ये, तहसीलदार मुकेश कांबळे, सरपंच नरेंद्र कोंडाजी जाधव, उपसरपंच विनायक निकम, ग्रामसेवक सुभाष कर्डक आदी उपस्थित होते.

यावेळी सरपंच श्री. जाधव यांनी राज्यपाल महोदयांना ग्रामपंचायती मार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

# Governor visits Avankhed Gram Panchayat

Governor Acharya Devvrat visited the model Gram Panchayat of Avankhed in Dindori taluka of Nashik and inspected its functioning. He appreciated the work carried out by the Gram Panchayat. Minister for Food and Drug Administration Narhari Zirwal, Divisional Commissioner Dr. Pravin Gedam, Secretary to the Governor Dr Prashant Naranware, District Collector Ayush Prasad, Chief Executive Officer of the Zilla Parishad Omkar Pawar, Superintendent of Police Balasaheb Patil, Assistant District Collector Kashmira Sankhye, Tahsildar Mukesh Kamble, Sarpanch Narendra Kondaji Jadhav, Deputy Sarpanch Vinayak Nikam, Gram Sevak Subhash Kardak, among others were present Village Sarpanch Shri Jadhav briefed the Hon’ble Governor about the various initiatives being implemented by the Gram Panchayat.

# राज्यपाल यांची हिंदुस्थान एरोनॉटिकल लिमिटेड (एचएएल) येथे भेट




राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी येथील हिंदुस्थान एरोनॉटिकल लिमिटेड (एचएएल) येथे भेट देऊन तेथील विमान निर्मिती आणि अनुषंगिक बाबींची माहिती घेतली. यावेळी त्यांनी तेथील तंत्रज्ञ, अधिकारी यांच्याशीही संवाद साधत आपण खऱ्या अर्थाने देशसेवेचे काम करत आहात, अशा शब्दांत त्यांचे कौतुक केले. एचएएलचे सीईओ साकेत चतुर्वेदी यांनी राज्यपालांचे स्वागत केले. यावेळी अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

Governor Acharya Devvrat visited Hindustan Aeronautics Limited (HAL) today, where he reviewed aircraft manufacturing and defense production including Sukhoi-30 MKI, Tejas, Dhruv, and Prachand. He praised engineers and officials for their service to the nation.



ग्लोबल टाइम्स

# आचार्य देवव्रत यांचे ओझर विमानतळ येथे आगमन व स्वागत



**नाशिक :** महाराष्ट्र व गुजरात राज्याचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांचे ओझर विमानतळ येथे आगमन झाले. यावेळी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी खासदार डॉ. शोभा बच्छाव यांनी तसेच प्रशासनाच्यावतीने विभागीय आयुक्त डॉ प्रवीण गेडाम यांनी राज्यपाल महोदयांचे स्वागत केले.

यावेळी पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, नाशिक मंडळचे मुख्य वनसंरक्षक जी. मल्लिकार्जुन, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त जलज शर्मा, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलीस अधीक्षक (ग्रामीण) बाळासाहेब पाटील, एचएएलचे मुख्य कार्यकारी अधिकारी संकेत चतुर्वेदी, उपवनसंरक्षक (पश्चिम) सिद्धेश सावर्डेकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, निवासी उपजिल्हाधिकारी रोहितकुमार राजपूत, सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (कळवण) कश्मिरा संखे, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंता अरुंधती शर्मा, उपजिल्हाधिकारी (सामान्य शाखा) कुंदन हिरे आदी उपस्थित होते.

लोकसत्ता

# आत्मनिर्भर भारतासाठी नैसर्गिक शेती काळाची गरज

## राज्यपाल आचार्य देवव्रत यांचे प्रतिपादन



मोहाडी येथील सह्याद्री फार्म येथे नैसर्गिक शेती संवाद कार्यक्रमांतर्गत आयोजित प्रदर्शनाची पाहणी करताना राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी शेतकऱ्यांकडून माहिती घेतली.

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**नाशिक** – खते, कीटकनाशकांच्या अतिवापराने देशातील सुपीक जमीन नापीक केली आहे. नापीक जमीन सुपीक बनवून आत्मनिर्भर भारत करण्यासाठी नैसर्गिक शेती करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केले.

दिंडोरी तालुक्यात मोहाडी येथील सह्याद्री फार्म येथे राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या उपस्थितीत गुरुवारी नैसर्गिक शेती संवाद कार्यक्रम झाला. यावेळी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, खासदार भास्कर भगरे, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, सह्याद्री फार्मचे व्यवस्थापकीय संचालक विलास शिंदे उपस्थित होते.

राज्यपाल म्हणून नव्हे, तर शेतकरी म्हणून संवाद साधण्यासाठी आल्याचे राज्यपाल देवव्रत यांनी नमूद केले. हरित क्रांती ही आपली गरज होती. तेव्हा जमीन सुपीक होती. त्यामुळे हेक्टरी १३ किलो युरिया वापराची सूचना कृषी शास्त्रज्ञांनी केली होती. आज हे प्रमाण अनेक पटीने वाढले आहे. त्याचे विपरीत परिणाम आता दिसून येत आहेत. सुपीक जमिनीतील सूक्ष्म जीव पूर्णपणे नष्ट झाले आहेत. याबरोबरच जागतिक तापमान वाढीची समस्या भेडसावत आहे. त्यामुळे काही भागात तीव्र उन्हाळा, तर काही भागात अतिवृष्टी होत असल्याचे दिसून येत आहे. खते, कीटकनाशकांचे अंश अन्नधान्यात आढळून येत आहेत. या अन्नधान्यामुळे मानवी प्रतिकारक्षमता कमी होऊन दुर्धर आजारांना सामोरे जावे लागत आहे. हे चिंताजनक आहे. जमिनीची जलसंधारणाची क्षमताही कमी झाली आहे. हे सर्व टाळायचे असेल, तर आपल्याला नैसर्गिक शेतीशिवाय पर्याय नाही. तसेच गोपालनाला चालना दिली पाहिजे, असेही राज्यपाल देवव्रत यांनी सांगितले. नैसर्गिक शेतीचा कृषी विभागाने प्रचार आणि प्रसार करावा. तसेच सह्याद्री फार्मने परिसरातील शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीस प्रोत्साहित करावे, असेही आवाहन त्यांनी केले.

विभागीय आयुक्त डॉ. गेडाम यांनी राज्यात नाशिक जिल्हा कृषी क्षेत्रात आघाडीवर असल्याचे सांगितले. जिल्ह्यात १० लाख हेक्टर क्षेत्रात विविध पिके घेतली जातात. येथील कांदा, द्राक्ष आणि वाइनला भौगोलिक मानांकन मिळाले आहे.

जिल्ह्यात केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत असल्याचे नमूद केले. शेतकरी संवाद कार्यक्रमात राज्यपाल देवव्रत यांनी शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन केले. या कार्यक्रमानंतर पिंपरखेड येथे प्रशासन गांव की ओर, छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान, आरोग्य शिबीर, एक पेड माँ के नाम हे कार्यक्रम पार पडले.

लोकमत

# राज्यपालांचा आश्रमशाळेत मुक्काम, आदिवासी कुटुंबासमवेत भोजन

## पिंपरखेडला शेतकऱ्यांशी संवाद : सेंद्रिय शेतीचा प्रसार करण्याचे आवाहन

लोकमत न्यूज नेटवर्क

**दिंडोरी :** नववर्षाच्या पहिल्या दिवशी महाराष्ट्र व गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी तालुक्यातील पिंपरखेड या गावात गुरुवारी (दि.१) रात्री आश्रमशाळेत मुक्काम करत तेथील आदिवासी कुटुंबासोबत भोजनाचा आस्वाद घेतानाच गावातील शेतकऱ्यांशी मुक्तपणे संवाद साधला. मला राजभवनापेक्षा शेतात, मातीशी नाळ जोडलेल्या शेतकऱ्यांमध्ये वावरायला अधिक आवडते, असे सांगत आचार्य देवव्रत यांनी महाराष्ट्रात लवकरच पारंपरिक सेंद्रिय शेतीचा व्यापक प्रसार होईल, असा विश्वास व्यक्त केला.

राज्यपाल आचार्य देवव्रत यांचे गुरुवारी (दि.१) दोन दिवसांच्या जिल्हा दौऱ्यासाठी दुपारी ओझर विमानतळावर आगमन झाले. दिंडोरी तालुक्यातील मोहाडी येथील सह्याद्री फार्म येथील शेती संवाद कार्यक्रमासह त्यांनी शासनाच्या विविध उपक्रमांना भेट दिल्या. त्यानंतर त्यांचे पिंपरखेड येथे गावकऱ्यांनी बैलगाडीतून मिरवणूक काढत त्यांचे स्वागत केले. त्यानंतर, आचार्य देवव्रत यांनी आदिवासी बांधव व शेतकऱ्यांशी संवाद साधला.



राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी पिंपरखेड येथील हिरामण शंकर साबळे व जाईबाई साबळे या आदिवासी दाम्पत्याच्या शेणा-मातीने सारवलेल्या घरी भारतीय बैठक मारत भोजनाचा आस्वाद घेताना. समवेत मंत्री नरहरी झिरवाळ.

### भोजनात उडदाचे भुजे, वरकंद भाजी

राज्यपालांनी पिंपरखेड येथील हिरामण शंकर साबळे व जाईबाई साबळे या आदिवासी दाम्पत्याच्या घरी भोजनाचा आस्वाद घेतला. शेणा-मातीने सावरलेल्या साध्या घरात भारतीय बैठकीत बसून त्यांनी भोजन केले. भोजनात लाल व पांढरी नागली, बाजरी-ज्वारी भाकरी व चपाती, इंद्रायणी भात व हात सडीचा भात, खुरसणी चटणी, हरभरा घोलाना, सुकडी भाजी, उडदाचे भुजे व तुरीचे वरण, वरकंद भाजी, वन्याची अळू-कंद व हाजर चवकी असा पारंपरिक, सात्त्विक व स्थानिक अन्नपदार्थांचा समावेश होता. यावेळी त्यांच्यासोबत अन्न औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, आदिवासी कृषी भूषण यशवंत गावंडे, विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, आयनखेडचे सरपंच नरेंद्र जाधव यांनी भोजन घेतले.

### सह्याद्री फार्म येथे नैसर्गिक शेती संवाद कार्यक्रमात सहभाग

रासायनिक खते, कीटकनाशकांच्या अति वापराने देशातील सुपीक जमीन नापीक केली आहे. ही नापीक जमीन सुपीक बनवून आत्मनिर्भर भारत करण्यासाठी नैसर्गिक शेती काळाची गरज असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केले.

दिंडोरी तालुक्यातील मोहाडी येथील सह्याद्री फार्म येथे आयोजित नैसर्गिक शेती संवादात ते बोलत होते. यावेळी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, खासदार भास्कर भगरे, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील, जिपचे सीईओ री ओमकार पवार, सह्याद्री फार्मचे व्यवस्थापकीय संचालक विलास शिंदे उपस्थित होते.



### राज्यपाल म्हणाले, मी स्वत: शेतकरी

मला राजभवनापेक्षा शेतात, मातीशी नाळ जोडलेल्या शेतकऱ्यांमध्ये वावरायला अधिक आवडते असे सांगत राज्यपालांनी आपण स्वतः शेतकरी असल्याचा उल्लेख केला. माझ्याकडे २०० पेक्षा अधिक गायी असून आठ गायींमागे सहा देशी गायी आहेत. गुजरातमधील डांग जिल्हा सेंद्रिय जिल्हा झाल्याचा दाखला देत महाराष्ट्रातही लवकरच परंपरागत सेंद्रिय शेतीचा व्यापक प्रसार होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### शहीद जवानांच्या मातांचा सन्मान

'एक पेड माँ के नाम' या अभियानांतर्गत राज्यपालांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. तालुक्यातील देशसेवेसाठी बलिदान दिलेल्या शहीद जवानांच्या मातांचा यावेळी सन्मान करण्यात आला. यावेळी लाभार्थ्यांना लाभ देण्यात आले.

# गांवकरी

www.gavakari.net
02 Jan 2026 - Page 1



**राज्यपाल देवव्रतांनी घेतला भाजी-भाकरीचा आस्वाद** पिंपरखेड (ता. दिंडोरी) येथील आदिवासी कुटुंब हिरामण साबळे यांच्या घरी राज्यपाल आचार्य देवव्रत, राज्याचे अन्न व नागरी पुरवठामंत्री नरहरी झिरवाळ, तसेच इतर अधिकाऱ्यांनी गुरुवारी जेवण घेतले. यावेळी राज्यपालांनी हरभऱ्याची भाजी, बाजरी व नागलीची भाकर, मिरचीचा ठेचा आदी गावरान पदार्थांचा आस्वाद घेतला. (सविस्तर वृत्त आतील पानात)

शब्दांना सत्याची धार
प्रहार

# आत्मनिर्भर भारत घडवण्यासाठी नैसर्गिक शेतीची गरज

**राज्यपाल आचार्य देवव्रत; सह्याद्री फार्म येथे शेतकरी, कृषी सखी व अधिकाऱ्यांशी संवाद**

◆ दिंडोरी (प्रतिनिधी) :

रासायनिक खते व कीटकनाशकांच्या अति वापरामुळे देशातील सुपीक जमीन नापीक होत आहेत. ती पुन्हा सुपीक करून आत्मनिर्भर भारत घडवण्यासाठी नैसर्गिक शेतीची गरज आहे, असे प्रतिपादन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केले. दिंडोरी तालुक्यातील मोहाडी येथील सह्याद्री फार्मवर आयोजित नैसर्गिक शेती संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, खासदार भास्कर भगरे, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, राज्यपाल यांचे सचिव प्रशांत नारनवरे, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, विभागीय कृषी सहसंचालक सुभाष काटकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने, सह्याद्री फार्मचे व्यवस्थापकीय संचालक विलास शिंदे उपस्थित होते. विभागीय आयुक्त डॉ. गेडाम यांनी नाशिक जिल्हा कृषी क्षेत्रात आघाडीवर असल्याचे सांगून, राज्यपालांच्या मार्गदर्शनामुळे शेतकरी नैसर्गिक शेतीकडे वळून प्रगती करतील, असा विश्वास व्यक्त केला. प्रारंभी मंगेश बासकर यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमानंतर राज्यपालांनी शेतकऱ्यांच्या स्टॉलला भेट देऊन संवाद साधला. यावेळी उपवनसंरक्षक सिद्धेश सावर्डेकर, आत्माचे प्रकल्प संचालक अभिमन्यू काशिद यांच्यासह शेतकरी, ग्रामस्थ व कृषी विभागाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.



छाया बाळासाहेब अस्वले

### जलसंधारण क्षमता घटली

हरित क्रांतीच्या काळात मर्यादित प्रमाणात खतांचा वापर होता; मात्र आज त्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून त्याचे दुष्परिणाम दिसत आहेत. जमिनीतील सूक्ष्मजीव नष्ट होत आहेत, जलसंधारण क्षमता घटली आहे, तसेच अन्नधान्यातील रासायनिक अंशामुळे मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहेत. हे टाळण्यासाठी नैसर्गिक शेती आणि गोपालनाला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. कृषी विभागाने नैसर्गिक शेतीचा प्रचार करावा, तसेच सह्याद्री फार्मने शेतकऱ्यांना प्रोत्साहित करावे.


- आचार्य देवव्रत, राज्यपाल

पुण्य नगरी

# खते, कीटकनाशकांमुळे दुर्धर आजारांचे रुग्ण वाढले - राज्यपाल देवव्रत

**▌नाशिकमध्ये शेतकरी, कृषी अधिकाऱ्यांशी साधला संवाद**

▌नाशिक : रासायनिक खते आणि कीटकनाशकांच्या अतिरेकामुळे देशातील सुपीक जमीन नापीक होत चालली आहे. याच रसायनांचा अन्नधान्यातील अंश मानवी शरीरात प्रवेश करत असल्याने दुर्धर आजारांचे प्रमाण धोकादायकरीत्या वाढले आहे. ही परिस्थिती केवळ शेतीसाठीच नव्हे, तर संपूर्ण मानवजातीसाठी गंभीर इशारा असून, नैसर्गिक शेतीशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही, असे ठाम मत राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी मांडले.



दिंडोरी तालुक्यातील मोहाडी येथील सह्याद्री फार्म येथे आयोजित नैसर्गिक शेती संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी अन्न व औषध प्रशासनमंत्री नरहरी झिरवाळ, खा. भास्कर भगरे, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

राज्यपाल म्हणाले की, मी आज राज्यपाल म्हणून नव्हे, तर शेतकरी म्हणून तुमच्याशी संवाद साधायला आलो आहे. हरितक्रांतीच्या काळात जमीन सुपीक होती. तेव्हा हेक्टरी केवळ १३ किलो युरिया वापरण्याची शिफारस होती. आज मात्र अनेक पटींनी अधिक खते जमिनीत टाकली जात आहेत. परिणामी जमिनीतील उपयुक्त सूक्ष्मजीव नष्ट होत आहेत. याबरोबरच जगाला तापमान वाढीची समस्या भेडसावत आहे. त्यामुळे काही भागात तीव्र उन्हाळा, तर काही भागात अतिवृष्टी होत असल्याचे दिसून येत आहे. जमिनीची जलसंधारणाची क्षमताही कमी झाली आहे. हे सर्व टाळायचे असेल, तर आपल्याला नैसर्गिक शेतीशिवाय पर्याय नाही. त्याबरोबरच गो पालनाला चालना दिली पाहिजे, असेही राज्यपाल देवव्रत यांनी सांगितले. नैसर्गिक शेतीचा कृषी विभागाने प्रचार आणि प्रसार करावा, तसेच सह्याद्री फार्मने परिसरातील शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीला प्रोत्साहित करावे, असे आवाहन राज्यपाल देवव्रत यांनी केले.

डॉ. प्रवीण गेडाम म्हणाले की, राज्यात नाशिक जिल्हा कृषी क्षेत्रात आघाडीवर आहे. जिल्ह्यात १० लाख हेक्टर क्षेत्रात विविध पिके घेतली जातात. येथील कांदा, द्राक्षे आणि वाइनला भौगोलिक मानांकन मिळाले आहे. जिल्ह्यात केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. तसेच राज्यपाल देवव्रत यांच्या मार्गदर्शनामुळे शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीसाठी प्रेरणा मिळून शेतकरी प्रगती साधतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. प्रारंभी मंगेश बासकर यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमानंतर राज्यपाल देवव्रत यांनी शेतकऱ्यांच्या स्टॉलसना भेट देत त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी उपवनसंरक्षक सिद्धेश सावर्डेकर, आत्माचे प्रकल्प संचालक अभिमन्यू काशिद यांच्यासह शेतकरी, ग्रामस्थ, कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

Mumbai Edition

# राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या सहज संवादाने जिंकली पिंपरखेडकरांची मने

**गावकऱ्यांच्या उत्स्फूर्त स्वागताने राजपाल महोदय भारावले**

नाशिक। प्रतिनिधी।

**जेमतेम दोन हजार लोकसंख्या असलेल्या दिंडोरी तालुक्यातील पिंपरखेड गावी आज वेगळीच लगबग होती. गावकऱ्यांच्या चेहऱ्यावर कुतूहल आणि उत्सुकता होती आणि त्याचबरोबर येणाऱ्या पाहुण्याच्या स्वागतासाठी ओसंडणारा आनंदही चेहऱ्यावर दिसत होता. महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज सायंकाळी या गावात प्रवेश केला आणि अवघे गाव आनंदले. बैलगाडीतून काढलेली मिरवणूक. त्यासमोर पारंपरिक आदिवासी नृत्याने भारावलेले वातावरण, लहान मुलांचे लेझीम नृत्य, टाळ, मृदुंगाचा ध्वनी आणि गावकऱ्यांच्या उत्साह पाहून राज्यपाल महोदयही भारावले. निमित्त होते राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या पिंपरखेड गावच्या भेटीचे. राज्यपाल महोदय दोन दिवसांच्या नाशिक दौऱ्यावर आले आहेत. त्यात पिंपरखेड गावी ते मुक्काम करून गावकऱ्यांशी संवाद साधणार आहेत. महाराष्ट्राचे राज्यपाल झाल्यानंतर अशाप्रकारे राज्यातील कोणत्याही गावी भेटीची आणि मुक्कामाची ही पहिलीच वेळ असल्याचे राज्यपाल श्री. देवव्रत यांनी आपल्या संवादात सांगितले.**



यावेळी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, विभागीय आयुक्त डॉ प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी काश्मिरा संख्ये, कादवा कारखान्याचेचेअरमन श्रीराम शेटे, उपविभागीय अधिकारी अप्पासाहेब शिंदे, तहसीलदार मुकेश कांबळे, सरपंच सोनाली मोरे, उपसरपंच वसंत घडवजे आदी उपस्थित होते. राज्यपाल महोदयांनी नागरिकांशी अतिशय जिव्हाळ्याने आणि मनमोकळा संवाद साधला. ते म्हणाले, हा माझ्या जीवनातील महत्वाचा क्षण आहे. महाराष्ट्र हा छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रदेश आहे. ही भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची कर्मभूमी आहे. अशा राज्यातील गावाला भेट देण्याचा खुप आनंद आणि समाधान असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यपाल श्री. देवव्रत म्हणाले, मी एक शेतकरी आहे. नैसर्गिक शेतीसाठी मी आग्रह धरतो. स्वतः शेतकरी असल्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात किती समस्या आहेत, याची मला जाणीव आहे. त्यामुळे राजभवन अर्थात लोकभवनमध्ये मी खूप कमी राहतो. लोकमध्ये राहायला मला आवडतं, अशा शब्दात त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

रासायनिक खतांमुळे शेतीचे अतोनात नुकसान होत आहे. त्यामुळेच नैसर्गिक शेतीचा मी आग्रह धरतो. माझ्या शेतात ८ प्रजातींच्या ४५० गायी आहेत. त्यातील ६ प्रजाती भारतीय आहेत, असेही ते म्हणाले. राज्यपाल महोदयांनी गावात मुक्काम करणार असल्याचे सांगताच गावकऱ्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला. राज्यपाल महोदयांच्या साधेपणा आणि थेट संवाद साधण्याच्या शैलीने गावकऱ्यांची मने मात्र जिंकून घेतली.

महाराजस्व अभियानात लाभार्थ्यांना प्रमाणपत्र आणि साहित्याचे वाटप पिंपरखेड येथे आज महसूल विभागामार्फत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान राबविण्यात आले. यावेळी याठिकाणी विविध विभागांचे एकूण २३ स्टॉल्स मांडण्यात आले होते. त्यातून ६५२ जणांना लाभ देण्यात आला. महसूल, जिल्हा परिषदेसह कृषी, पशुसंवर्धन, आरोग्य, उमेद, आदिवासी प्रकल्प विभाग आदी विभागांचा यात समावेश होता. राज्यपाल महोदयांनी यावेळी प्रातिनिधिक स्वरूपात प्रमाणपत्र आणि साहित्याचे वितरण केले.


घरकुल, दिव्यांग प्रमाणपत्र यासह बहुविभागीय योजनांचा लाभ यावेळी लाभार्थ्यांना देण्यात आला. तसेच सीमा सुरक्षा दलामध्ये निवड झाल्याबद्दल नवनाथ गांगुर्डे यांचा आणि त्यांच्या पालकांचा सत्कारही राज्यपाल महोदयांनी केला. दत्तात्रय वाणी यांना राज्यस्तरीय क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी दिंडोरी तालुक्यातील शहीद झालेल्या जवानांच्या आई वडिलांचाही सन्मान करण्यात आला. यावेळी आदिवासी संघटना तसेच पिंपरखेड गावकऱ्यांच्यावतीने सरपंच आणि उपसरपंच यांनी राज्यपाल महोदय यांचा सत्कार केला.

नव शक्ति
Fri, 02 January 2026
https://epaper.freepressjournal.in/c/78849820

लोकमत

# ग्रामस्वच्छता, नैसर्गिक शेतीचा संदेश; गोपालनाचा सल्ला

## राज्यपाल पिंपरखेडमध्ये रमले : बांधावर जात शेतकऱ्यांशी साधला संवाद







दिंडोरी तालुक्यातील पिंपरखेड येथे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जात घास कापला तसेच तिफण हाती घेत पेरणीचा आनंद लुटला. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसमवेत योगासने करत सुदृढ आरोग्याचाही संदेश दिला.

लोकमत न्यूज नेटवर्क

**दिंडोरी :** जिल्ह्यात दोन दिवसांच्या दौऱ्यावर असलेले महाराष्ट्र व गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी शुक्रवारी (दि.२) पिंपरखेड येथे विद्यार्थ्यांसमवेत योगाची आसने करतानाच स्वच्छता मोहीम राबवत ग्राम स्वच्छतेचा संदेश दिला. याशिवाय, शेतीच्या बांधावर जात शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीचे महत्त्व समजावले. श्रमदान करत घास कापणी केली आणि खोरीपाडा येथील शेतात प्रत्यक्ष तिफण हाताळत ज्वारीची पेरणी देखील केली.

तालुक्यातील पिंपरखेड येथील शेतकरी सुनील घडवजे यांच्या शेतावर शुक्रवारी सकाळी राज्यपालांनी भेट देत प्रत्यक्ष श्रमदान केले. त्यानंतर शेताच्या बांधावरच शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांनी नैसर्गिक शेतीचे महत्त्व सांगितले. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना त्यांनी जीवामृत तयार करण्याचे प्रात्यक्षिक दाखवले. राज्यपाल देवव्रत म्हणाले, रासायनिक खते व कीटकनाशकांच्या अतिवापरामुळे नापीक होत चाललेली जमीन पुन्हा सुपीक करायची असेल, तर

### तिफण हाती घेत केली पेरणी

खोरीपाडा येथील शेतकरी सम्राट राऊत यांच्या शेतात राज्यपालांनी प्रत्यक्ष तिफण हाताळत ज्वारीची पेरणी केली. राज्यपालांच्या या अनौपचारिक पण अर्थपूर्ण भेटीमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. शेताच्या बांधावर उभे राहून त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. राज्यपालांच्या सन्मानार्थ राऊत कुटुंबाने नैसर्गिक शेतीत पिकविलेल्या उत्पादनांची अनोखी भेट देत सत्कार केला. तसेच आदिवासी बांधवांचे पारंपरिक वाद्य 'पावरी' राज्यपालांना भेट दिली. ग्रामीण संस्कृतीचा प्रत्यय देत नागलीची पेज, तांदळाचे थिरडे अशा खास देशी पदार्थांनी राज्यपालांचे आदरातिथ्य करण्यात आले.

नैसर्गिक शेतीकडे वळणे आवश्यक आहे. या नैसर्गिक शेतीसाठी जीवामृत हेच खरे अमृत आहे, असे प्रतिपादन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केले. राज्यपालांनी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांचे समवेत श्रमदान करत शेतात घास कापणी केली.

कापलेला चारा त्यांनी गाय व कालवडीला खाऊ घातला. त्यानंतर शेतकऱ्यांकडील देशी गायींबाबत माहिती घेत प्रत्येक शेतकऱ्याने गोपालन करावे, असा सल्ला दिला.

### पिंपरखेडला केली स्वच्छता

राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी पिंपरखेड येथील मारुती मंदिर परिसरात स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला. यावेळी राज्यपालांनी गावकऱ्यांशी संवाद साधत त्यांना ग्रामस्वच्छतेचा संदेश दिला. राज्यपालांच्या हस्ते गावातील स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. राज्यपालांनी अवनखेड ग्रामपंचायतीला भेट देत माहिती जाणून घेत संवाद साधला.

### मुलांना दिला शिकण्याचा सल्ला

पिंपरखेड येथील आदिवासी विकास विभागाच्या शासकीय निवासी आश्रमशाळेत राज्यपालांनी विद्यार्थ्यांशी सकाळच्या नाश्ता वेळी संवाद साधला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांबरोबर बसून नाश्ता घेत आपुलकीने गप्पा मारल्या. विद्यार्थी कोणत्या वर्गात शिक्षण घेत आहेत, त्यांच्या कुटुंबात किती सदस्य आहेत, आई-वडील काय काम करतात, याबाबत त्यांनी प्रेमळ चौकशी केली. राज्यपालांनी आश्रमशाळेतील शिक्षण व्यवस्था, अध्यापनाचे माध्यम व उपलब्ध सुविधा याबाबत आदिवासी विकास विभागाच्या आयुक्त लीना बनसोड यांच्याकडून सविस्तर माहिती घेतली.

सकाळ

# राज्यपालांनी तिफनवर केली ज्वारीची पेरणी

## खोरीपाडा गावात गोमाता पूजन, लसीकरण

■ सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. २ : खोरीपाडा (ता. दिंडोरी) येथील आदर्श शेतकरी सम्राट राऊत यांच्या शेतात जाऊन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी तिफनवर ज्वारीची पेरणी करून आपण शेतकरी असून, २०० एकर शेती आणि ४२५ गायी सांभाळतो. नैसर्गिक शेती करून रासायनिक शेतीपेक्षा जास्त उत्पन्न घेतो, अशी माहिती शेतकरी बांधवांशी बोलताना दिली.

शेतीविषयी चर्चा करताना त्यांना नैसर्गिक शेतीकडे वळण्याचे आवाहन केले. राज्यपालांच्या भेटीने शेतकऱ्यांना झालेला आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. नाशिक जिल्हा दौऱ्यात ग्रामस्थांकडून मिळालेल्या प्रेमाने व आदरातिथ्याने भारावून गेल्याची भावना देवव्रत यांनी व्यक्त केली.

या वेळी राऊत कुटुंबानेही नैसर्गिक शेतीत पिकविलेल्या वस्तूंची अनोखी भेट देऊन राज्यपाल देवव्रत यांचा सत्कार केला. राज्यपालांची ही भेट स्मरणीय करण्यासाठी पावरी हे आदिवासी बांधवांचे पारंपरिक वाद्य त्यांना दीपक झिरवाळ यांच्या हस्ते भेट देण्यात आले.



खोरीपाडा (ता. दिंडोरी) : येथील सम्राट राऊत यांच्या शेतात ज्वारीची पेरणी करताना राज्यपाल आचार्य देवव्रत.

### राऊत कुटुंबीयांचे खास आदरातिथ्य

■ राऊत कुटुंबाने खास ग्रामीण चवीची नागलीची पेज, तांदळाचे धिरडे तयार करून राज्यपाल महोदयांचे आदरातिथ्य केले. देवव्रत यांनी या पदार्थांचा आनंदाने आस्वाद घेत ते आवडल्याची पावतीही दिली. कौटुंबिक स्नेहाचा परिचय देत त्यांनी कुटुंबातील सदस्यांची प्रेमाने विचारपूस केली. त्यांनी जनावरांच्या गोठ्याची पाहणी आणि शेताच्या बांधावर वृक्षारोपणही केले. तसेच, पशुसंवर्धन विभागाने लावलेल्या स्टॉलला भेट दिली. पारंपरिक आदिवासी संस्कृतीनुसार राज्यपाल महोदयांचे करण्यात आलेले औक्षण आणि स्वागताचा देवव्रत यांनी मोकळेपणाने केलेला स्वीकार उपस्थित शेतकऱ्यांसाठी आनंदाचा अनुभव होता. या वेळी परिसरातील शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

मटा अँकर | सापुतारा मार्गावरील खोरीपाड्यात ज्वारीचे नवे वाण

# हुरडा पर्यटनाची राज्यपालांकडून 'पेरणी'

प्रवीण बिडवे

### देवव्रत हे अन्नाची कदर करणारे व्यक्तिमत्त्व



मटा विशेष




- सम्राट राऊत, आदर्श शेतकरी

---

कार्यक्रम | दिंडोरी तहसील के मोहाडी में आयोजित 'प्राकृतिक खेती संवाद' में राज्यपाल आचार्य देवव्रत ने कहा

# 'आत्मनिर्भर भारत' बनाने के लिए प्राकृतिक खेती अपनानी होगी



और आने वाली पीढ़ियों को बीमारियों से बचाना है तो प्राकृतिक खेती को अपनाना होगा। यह अब केवल विकल्प नहीं बल्कि समय की सबसे बड़ी मांग है। यह बात राज्यपाल आचार्य देवव्रत ने कही। वे नाशिक के दिंडोरी तहसील स्थित मोहाडी में आयोजित 'प्राकृतिक खेती संवाद' कार्यक्रम में किसानों, कृषि सखियों और कृषि विभाग के अधिकारियों को संबोधित कर रहे थे।

राज्यपाल ने केमिकल खेती से बढ़े स्वास्थ्य और पर्यावरण संकट तथा खेती की वर्तमान चुनौतियों पर चिंता जताते हुए

### बीमारियों का बढ़ता जाल

उन्होंने कहा कि रासायनिक खेती के कारण अनाज जहरीला हो रहा है। इससे मानव शरीर की रोग प्रतिरोधक क्षमता घट रही है और कैंसर जैसे गंभीर रोगों का प्रसार बढ़ रहा है। बेमौसम बारिश, भीषण गर्मी और सूखा जैसी प्राकृतिक आपदाएं प्रकृति के साथ किए गए खिलवाड़ का ही परिणाम हैं। इसका समाधान गो-पालन और प्राकृतिक तकनीक है। राज्यपाल ने जोर देकर कहा कि मिट्टी की जलधारण क्षमता और उर्वरता वापस पाने के लिए प्राकृतिक खेती और गो-पालन को एकीकृत करना होगा। उन्होंने कृषि विभाग को निर्देश दिया कि वे प्राकृतिक खेती का व्यापक प्रचार-प्रसार



### राज्यपाल ने किया किसान के घर भोजन का आनंद

राज्यपाल आचार्य देवव्रत ने दिंडोरी तहसील स्थित पिंपरखेड़ गांव में साबले परिवार के घर पारंपरिक ग्रामीण भोजन का स्वाद लिया। उन्होंने भोजन करने आएंगे तो परिवार ने तैयारियां शुरू कर दीं। घर की रंग-रोगन की गई और प्रवेश द्वार की दीवारों पर वारली चित्रकला सजाई

**लोकमत**

# मुलांनो खूप शिका; मेहनत करा, मोठे व्हा!

## राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी साधला विद्यार्थ्यांशी संवाद

**नाशिक । प्रतिनिधी ।**



मुलांनो खूप शिकून मोठे व्हा. त्यासाठी परिश्रम घ्या, असे आवाहन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केले. पिंपरखेड, ता. दिंडोरी येथील आदिवासी विकास विभागाच्या शासकीय निवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांशी सकाळच्या नाश्त्याच्यावेळी त्यांनी संवाद साधला.

यावेळी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, राज्यपाल यांचे सचिव प्रशांत नारनवरे, आदिवासी विकास विभागाच्या आयुक्त लीना बनसोड, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, सहायक जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे, कश्मिरा संख्ये, आदिवासी विकास विभागाचे अपर आयुक्त दिनकर पावरा आदी उपस्थित होते.

राज्यपाल श्री. देवव्रत यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्याबरोबर नाश्ता घेतला. यावेळी त्यांनी विद्यार्थी कोणत्या वर्गात शिक्षण घेत आहे. कुटुंबात सदस्य किती, आईवडील काय करतात, अशी आपुलकीने चौकशी केली. त्यांनी आयुक्त श्रीमती बनसोड यांच्याकडून आश्रमशाळा तेथील शिक्षणाचे माध्यम याविषयी सविस्तर माहिती जाणून घेतली. यावेळी राज्यपाल श्री. देवव्रत यांना विद्यार्थिनीने काढलेले लहानसे चित्र भेट दिले. राज्यपालांसमवेत नाश्ता करतांना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

---

शिल्पकार विकासाचा...
**देशदूत**
नाशिक आवृत्ती
epaper.deshdoot.com
02 Jan 2026 - Page 1

# राज्यपालांचा पिंपरखेडकरांशी संवाद

## बैलगाडीतून प्रवास, जमिनीवर बसून जेवण

**दिंडोरी । प्रतिनिधी**



राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी पिंपरखेड गावाला भेट देत हनुमान मंदिरातील पारंपरिक चावडीवर गावकऱ्यांशी थेट संवाद साधला. राज्यपाल पदावरील व्यक्तीने प्रथमच थंडीच्या वातावरणात गावात येऊन चावडीवर बसत नागरिकांशी मनमोकळ्या गप्पा मारल्याने हा दौरा ऐतिहासिक ठरला. त्यांनी बैलगाडीतून प्रवास केला. ग्रामस्थांनी त्यांचे स्वागत केले.

यावेळी राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी स्वच्छता, पर्यावरण संरक्षण, शिक्षण, संस्कृती आणि 'बेटी बचाव, बेटी पढाव' **पान ८ वर** >>>

---

**पुढारी**

# पिंपरखेड शाळेत केले वृक्षारोपण

**नाशिक :** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल विभागाच्या 'एक पेड माँ के नाम' उपक्रमांतर्गत राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी पिंपरखेड (ता. दिंडोरी) येथील लक्ष्मण बाबाजी धात्रक माध्यमिक विद्यालयात वृक्षारोपण केले.

यावेळी अन्न औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, सामाजिक न्याय मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके, आदिवासी विभागाचे सचिव विजय वाघमारे, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, वन विभागाचे मुख्य वनसंरक्षक जी. मल्लिकार्जुन, आदिवासी विकास आयुक्त लीना बन्सोड, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, आदिवासी विकास प्रकल्प नाशिकच्या प्रकल्प अधिकारी अर्पिता ठुबे, कळवणच्या काश्मिरा संखे, उपवनसंरक्षक सिद्धेश सावर्डेकर, उपवनसंरक्षक राकेश सेपट आदी उपस्थित होते. राज्यपाल देवव्रत यांनी शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, पिंपरखेड येथे भेट दिली. यावेळी आदिवासी विकासमंत्री अशोक उईके यांनी सत्कार केला.

---

# प्रत्येक गाव स्वच्छतायुक्त बनवा

## राज्यपाल देवव्रत यांचे पिंपरखेडला आवाहन





**दिंडोरी : प्रतिनिधी**

नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी महाराष्ट्र व गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी तालुक्यातील पिंपरखेड गावाला भेट देऊन तेथील गावाचा आराखडा पाहत गावातील स्वच्छता व वृक्षसंवर्धन याविषयी समाधान व्यक्त केले. गावात रात्री आश्रमशाळेत मुक्काम करत तेथील आदिवासी कुटुंबासोबत भोजनाचा आस्वाद घेतानाच शेतकऱ्यांशी मुक्तपणे संवाद साधला. महाराष्ट्रातील प्रत्येक गाव स्वच्छतायुक्त बनवा, असे आवाहन त्यांनी केले.

पिंपरखेड येथे पहाटे गावातील एका शेतकऱ्याच्या शेतात जाऊन त्यांनी चक्क एका गायीचे दूध काढून आपणही एक शेतकरी कुटुंबातील असल्याचे ग्रामस्थांना सांगितले. आपली शेती ही सेंद्रिय पद्धतीची करावी, जेणेकरून शेतकऱ्यांना याचा फायदा होईल, तसेच गावातील ग्रामस्थांना व शेतकऱ्यांना एकत्र करून स्वच्छतेचे धडे देऊन स्वच्छता अभियान राबवून पिंपरखेड ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचाऱ्यांना एक रोप भेट देऊन सत्कार केला. 'एक माँ, एक पौधा' असा संदेश देत झाडाची लागवड करून त्याचे संवर्धन करा, असे आवाहन केले. मला राजभवनापेक्षा शेतात मातीशी नाळ जोडलेल्या शेतकऱ्यांमध्ये वावरायला अधिक आवडते, असे सांगत राज्यपालांनी आपण स्वतः शेतकरी असल्याचा उल्लेख केला. माझ्याकडे २०० पेक्षा अधिक गायी असून, आठ गायींमागे सात देशी गायी आहेत. गुजरातमधील डांग जिल्हा सेंद्रिय जिल्हा झाल्याचा दाखला देत महाराष्ट्रातही लवकरच परंपरागत सेंद्रिय शेतीचा व्यापक प्रसार होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**शहीद जवानांच्या मातांचा सन्मान**

'एक पेड माँ के नाम' या अभियानांतर्गत राज्यपालांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. तालुक्यातील देशसेवेसाठी बलिदान दिलेल्या शहीद जवानांच्या मातांचा सन्मान केला. यावेळी लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला.

दै. सकाळ ॲग्रोवन, नाशिक

दि. ३ जानेवारी, २०२६

---

# राज्यपालांनी घातली शाश्वत ग्रामविकासाची साद

## पिंपरखेडच्या ग्रामस्थांसमवेत चावडीवर साधला दिलखुलास संवाद

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

**नाशिक :** दिंडोरी तालुक्यातील पिंपरखेडवासी चावडी एका ऐतिहासिक प्रसंगाची साक्षीदार झाली. निमित्त होते, राज्यपाल आचार्य देवव्रत यांचा दौरा आणि आदिवासी आश्रमशाळेत केलेला मुक्काम.

शिष्टाचार बाजूला सारून प्रमुख अधिकाऱ्यांसोबत ते गावात उपस्थित झाले. ग्रामस्थांनी त्यांची बैलगाडीतून काढलेली मिरवणूक लक्षवेधी ठरली. त्यानंतर चावडीवर टाकलेल्या सतरंजीवर बसून राज्यपालांनी शाश्वत ग्रामविकासावर दिलखुलास संवाद साधला. वायू वृक्षसंवर्धन, आरोग्य, संस्कारक्षम पिढी व विषमुक्त शेतीवर त्यांनी उपस्थितांना संबोधित केले.

राज्यपाल आचार्य देवव्रत हे १ व २ जानेवारी रोजी नाशिक जिल्हा दौऱ्यावर होते. गुरुवारी (ता. १) रात्री त्यांनी दिंडोरी तालुक्यातील पिंपरखेड येथील मारुती मंदिराजवळील चावडीवर ग्रामस्थांशी संवाद साधला.

ते म्हणाले, खते व कीटकनाशकांचे अंश अन्नधान्यात आढळून येत असल्याने मानवी प्रतिकारशक्ती कमी होत असून दुर्धर आजारांसह मधुमेह, रक्तदाब यांचे प्रमाण वाढत आहे. ही बाब चिंताजनक आहे. हे संकट टाळायचे असेल तर नैसर्गिक शेतीशिवाय पर्याय नाही. त्यासाठी गोपालनास प्रोत्साहन देणे अत्यंत आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद सांगितले.



खोरीपाडा : सम्राट राऊत यांच्या शेतात राज्यपालांनी तिफणचा केली न्याहारीची पेरणी.



**Concept:** **Umesh Kashikar,** PRO, Lok Bhavan, **Inputs:** **Dr Kiran Moghe,** Dy. Dir. (Information, Pune & Nashik), **Dr Vilas Bodke,** DIO, Nashik, **Gopal Salunkhe,** Information Officer, Nashik, **Deepak Chavan,** Asstt. Dir. Nashik, Photographers of DGIPR, **Design and Layout:** **Nagorao Rodewad,** PR Branch Lok Bhavan, **Special Thanks:** **Prashant Jadhav,** Bluesky Communications, **Ramesh Patil** and **Dhiraj Pedekar,** Lok Bhavan